फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड
(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय)
CIN : U45200 MH 1974 SGC 017206
एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर-४४००३६
Email: md@fdcm.nic.in, gm.hqnag12@gmail.com
फोन नं.०७१२-२८११९३९,२८११९६२,२८११९६३

## फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड सेवा परीक्षा- २०१८

### सुधारीत वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १ | दिनांक ३.५.२०१८ ते दिनांक ५.५.२०१८ (सकाळी ९.०० वाजेपासुन) | मुख्य परीक्षेनंतर मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांचे Document verification |
| | | मुलाखती |
| | | **शारीरीक पात्रता तपासणी** (शारीरीक मोजमापे घेणे) |
| २ | दिनांक ६.५.२०१८ ते ७.५.२०१८ | अस्थायी निवड सूची (Provisional selection List) तयार करणे/जाहिर करणे |
| ३ | दिनांक १०.५.२०१८ ते ११.५.२०१८ | अस्थायी निवड सूचीतील (Provisional selection List) उमेदवारांची जिल्हा शल्य चिकीत्सक, नागपुर यांचेकडुन वैद्यकीय तपासणी करुन घेणे |
| ४ | दिनांक १२.५.२०१८ | अस्थायी निवड सूचीतील (Provisional selection List) उमेदवारांची चालणे पात्रता परिक्षा (पुरुष उमेदवार २५ कि.मी. व महिला उमेदवार १६ कि.मी.४ तासात चालणे |
| ५ | दिनांक १२.५.२०१८ ते १४.५.२०१८ | अ) सहाय्यक व्यवस्थापक व वनपरीक्षेत्र अधिकारी या पदावर नियुक्तीकरीता निवड झालेल्या उमेदवारांनी विहित बंधपत्र व करारनामा एफडीसीएम लि.नागपूर कडे सादर करणे |
| | दिनांक १५.५.२०१८ ते १६.५.२०१८ | ब) बंधपत्र व करारनामा एफडीसीएम लि.कडे सादर केलेल्या उमेदवारांचे सक्षम प्राधिका-याकडुन प्रशिक्षणाकरीता शिफारस पत्र जारी करणे |
| ६ | दिनांक १७.५.२०१८ नंतर | नियुक्ती करीता निवड केलेल्या उमेदवारांना निश्चित केलेल्या केंद्र शासनाच्या प्रशिक्षण संस्थेत नियुक्तीपूर्व प्रशिक्षणाकरीता उपस्थित होणे |

**उमेदवारांकरीता महत्वाच्या सुचना:**

१. मुलाखतीस येतांना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र, वयाचे प्रमाणपत्र, शासन सेवेत असल्यास सेवा अभिलेखातील प्रमाणित उता-याची प्रत, पदवी, पदवीका प्रमाणत्र, गुणपत्रिका (गुणाऐवजी श्रेणी पध्दती असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी), उमेदवार मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा, मराठी भाषा वाचू,लिहू आणि बोलू शकतो अशा आशयाचे संविधीक विद्यापिठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या प्राचार्यानी प्रतिस्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी आरक्षित पदावर दावा करणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र, खेळाच्या प्रमाणत्र पडताळणीचे विभागीय उपसंचालकाचे प्रमाणपत्र, विवाहित महिलांच्या बाबतीत नाव बदल झाल्याचा पुरावा, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र, वय,राष्ट्रीयता व अधिवास प्रमाणपत्र, संगणक अर्हता व इतर कागदपत्रांची साक्षांकित केलेल्या २ प्रती व मुळ प्रमाणपत्र सोबत आणावे.

२. **भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने करण्यात येईल याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी व कोणत्याही अधिकारी/कर्मचारी/व्यक्तीना संपर्क करु नये.**

३. अस्थायी निवडसूचीमधील उमेदवारांना जिल्हा शल्य चिकीत्सक,नागपूर यांचेकडे उपस्थित राहुन त्यांची वैद्यकीय तपासनी करुन घेवुन सेवेस वैद्यकीय दृष्टया पात्र/अपात्रतेचे प्रमाणपत्र विहित कालावधीत या कार्यालयास प्रत्यक्ष सादर कररणे अनिवार्य राहिल. जिल्हा शल्य चिकीत्सक,नागपूर यांचेकडे वैद्यकीय तपासणीस उपस्थित राहण्याचे पत्र या कार्यालयाकडुन प्राप्त करावे.

४. अस्थायी निवडसूचीमधील उमेदवारांनी चालणे पात्रता परीक्षेकरीता (पुरुष उमेदवारांची ४ तासात २५ कि.मी. व महिला उमेदवारांची ४ तासात १६ कि.मी. चालणे) सदर चाचणीमध्ये मी स्वच्छेने सहभागी होत असल्याचे व चाचणीकरीता शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे ,शारीरीक क्षमता चाचणी दरम्यान शारीरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्यास फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर जबाबदार राहणार नाही असे स्वत:चे वचनपत्र तसेच सदर चाचणीस वैद्यकीयदृष्टया सक्षम असल्याचे पंजिकृत वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. वचनपत्र व प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडलेला आहे.

५. उमेदवारांनी स्वत:चे कमीत कमी १० फोटो सोबत आणावे. ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड,निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट,पॅन कॉर्ड,ड्रायव्हींग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

६. निवडसूचीतील उमेदवारांनी सोबतच्या नमुना पत्राप्रमाणे बंधपत्र व करारनामा रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर तयार करुन सोबत आणणे अनिवार्य आहे. त्यांनी बंधपत्र व करारनामा सादर केल्यामुळे त्यांची अंतिम निवड झाली असे उमेदवारांनी समजु नये.

७. निवड झालेल्या उमेदवारास विहित केलेले प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यावर सदर पदावर किमान ७ वर्ष सेवा पूर्ण करावी लागेल.विहित प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा विहित किमान ७ वर्ष कालावधीची सेवा पूर्ण न केल्यास, एफडीसीएम लि.ने त्यांचे प्रशिक्षणावर केलेल्या खर्चासाठी एफडीसीएम लि.कडुन वेळोवेळी निश्चित करण्यात येईल इतक्या रकमेची प्रतिपूर्ती करावी लागेल.

व्यवस्थापकीय संचालक

## उमेदवाराने द्यावयाचे वचनपत्र.

मी खालील सही करणार वचनपत्र लिहून देतो की, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर मधील सरळसेवेने सहाय्यक व्यवस्थापक/वनक्षेत्रपाल भरती-२०१८ अंतर्गत मी उमेदवार म्हणून आवदेनपत्र दाखल केले आहे. सदर भरती प्रक्रियेचा भाग म्हणुन शारीरीक क्षमता चाचणीमध्ये २५ कि.मी. (पुरुष उमेदवार)/ १६ कि.मी. (स्त्रि उमेदवार) चार तासात पूर्ण करण्याच्या चाचणीमध्ये मी स्वच्छेने सहभागी होत आहे. सदरहू चाचणीकरीता मी शारीरीकदृष्टया सक्षम आहे. शारीरीक क्षमता दरम्यान माझी शारीरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्यास फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर जबाबदार राहणार नाही.

करीता हे वचनपत्र लिहून देण्यात येत आहे.

ठिकाण: नागपूर

दिनांक: / /२०१८

उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे नाव: ____________________

बैठक क्रमांक: ____________

- -ooo --

## वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र.

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी ____________________ वय ____ वर्ष राहणार ____________________ हे/ हया २५ कि.मी. (पुरुष उमेदवार)/ १६ कि.मी. (स्त्रि उमेदवार) चार तासात चालणे चाचणीस वैद्यकीयदृष्टया समक्ष आहेत. .

ठिकाण: नागपूर

दिनांक: / ०४/२०१३

पंजिकृत वैद्यकिय अधिका-याची स्वाक्षरी व नोंदणी क्रमांक